# मराठ्यांच्या इतिहासाचे पुनर्लेखन

## REWRITING OF THE MARATHA HISTORY


संपादक

डॉ. जगदीश भेलोंडे  डॉ. कारभारी भानुसे

डॉ. प्रकाश महाजन




Scanned by CamScanner

p- 110-116

# मराठ्यांच्या इतिहासाचे पुनर्लेखन

*संपादक*

डॉ. जगदीश भेलोंडे * डॉ. कारभारी भानुसे

डॉ. प्रकाश महाजन

प्राचार्य

... कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, कन्नड

Scanned by CamScanner

१४. शिवचरित्र पूनर्लेखन : काळाजी गरज / ९७
प्रा.डॉ. उत्तमराव हनवते

१५. मराठेकालीन जाती व्यवस्था आणि अस्पृश्यता / १०७
प्रा. डॉ. दिलीप तुकाराम कदम

१६. महाराष्ट्र धर्म- संकल्पना व वास्तव / १०६
प्रा. सुनिल रामकृष्ण वाघमारे

१७. आसई युध्द - मराठा युध्द नितिचा पराभव / ११०
प्रा.डॉ. प्रशांत देशमुख

१८. पन्हाळा किल्ला एक अभ्यास / ११७
प्रा. डॉ. कोंडेकर आर. एस.

१९. मराठा कालखंडातील उदयोगधंदे व व्यापार / १२३
प्रा. डॉ. कृष्णा मालकर

२०. शिवकालीन उद्योग व व्यापार / १२८
प्रा. शेटोंड एस.एन., डॉ. मुटकुळे आर.आर.

२१. मराठेकालीन सामाजिक व धार्मिक जीवन / १३३
प्राचार्या डॉ. शारदा बंडे

२२. छ. शिवरायांचे सामाजिक धोरण / १३७
प्रा. राहुल चोखाजी साळवे

२३. अस्पृश्य जातींची मराठा कालखंडातील सामाजिक स्थिती आणि स्वराज्यातील सहभाग / १४२
प्रा. सचिन रमेश साळवे

२४. मराठेकालीन स्थापत्यकला - किल्ले, गढया व वाडे / १४८
प्रा. प्रभाकर गणपत गावंडे

२५. मराठ्यांच्या इतिहासाचे निर्भिड इतिहासकार राजारामशास्त्री भागवत / १५६
डॉ. प्रभाकर मिरकड

२६. मराठी कालीन धार्मिक व सामाजिक परिस्थिती / १६०
प्रा.डॉ. शेख एजाज एम.

२७. छत्रपती शिवाजी महाराज : धर्मनिरपेक्ष व सामाजिक समतेचे महानायक / १६६
डॉ. जी. एच. पटेल

समाज बांधणीच्या दृष्टीकोणातून शिवाजी महाराजांचे धार्मिक धोरण / १८०
माले हरी नारायण

शिवाजी महाराजांचे लष्करी व्यवस्थापन / १८४
. अरुण दळवे, प्रा. अमोल गंगणे


Scanned by CamScanner

# 17 आसई युध्द - मराठा युध्द नितिचा पराभव

**प्रा.डॉ. प्रशांत देशमुख**
**इतिहास विभाग,**
गरुड कॉलेज शेदुर्णी जि. जळगाव.

**पार्श्वभूमी -** आसई हे ता. भोकरदन जि. जालनामधील गांव जुहा नदीकाठी वसलेले सपाट प्रदेश असलेले गांव आहे. औरंगाबाद पासून ईशान्य (NE) भागात ७२ कि.मी अंतरावर आहे. भोकरदन पासून आसई पूर्व भागात ७ मैल आहे. इ.स. १७९८ ला ग.ज. म्हणून लॉड आर्थर वेलस्लीने सत्ता स्विकारली. अनेक संस्थानिकांनी वेलस्लीच्या तैनानी फौजेंचा स्वीकार केला. निजामाने ब्रिटिश फौज स्वीकारली[१]. इ.स. १८०२ ला मराठयांनी - बाजीरावांनी दुसरा वसईचा तह केला.

ब्रिटिशांचे दक्षिण भारतात दुस-या मराठा युध्दाच्या काळात रघुजी भोसले - दुसरा आणि दौलतराव शिंदे हे दोघे ब्रिटिशांचे शत्रू होते. वसईच्या तहाने पेशवा बाजीराव दुस-याने तैनाती फौज स्वीकारल्याने दोघे नाराज झाले. दौलतराव शिंदेंनी उत्तरेत उज्जैनजवळ कर्नल कॉलिन्सद्वारे मैत्रीचा प्रस्ताव फेब्रु २०, १८०२ ला फेटाळला. होळकर (यशवंतरावच्या) पुण्यातील स्वारीमुळे इंग्रज रेसिडेंट जोनाथन डंकन समोर बाजीरावाने आत्मसमर्पण केले. आणि ३१ डिसें १८०२ ला मैत्रीचा करार केला. म्हणूनच दौलतराव शिंदे यास हा करार मान्य नव्हता. दौलतरावाने उज्जैनहून ब-हापूरला येवून नागपूरकर भोसलेंशी करार केला[२].

१४ जून १८०३ ला शिंदे + भोसले यांची भेट फर्दापूर ता. सोयगांव जि. औरंगाबाद येथे झाली. म्हणूनच ०७ ऑगस्ट १८०३ ला ऑर्थर वेलस्लीने दोघांविरुध्द युध्द घोषीत केले. १२ ऑगस्टला (१८०३) किल्ला अहमदनगरचा शिंदे सरदाराकडून ताब्यात घेतला. उत्तरेत शिंदेंना पराभूत करण्यासाठी ग.ज. वेलस्लीने नेतृत्व जन. लेक आणि दक्षिणेत भाऊऑर्थर वेलस्लीकडे दिली[३]. २९ ऑगस्टला ऑर्थर वेलस्ली औरंगाबादेत आला.

कॉलिन्स या ब्रिटिश राजदुताचा मैत्रीचा प्रस्ताव दौलतरावाने ठोकरला. उलटपक्षी दौलतरावांनी बाजीरावास लिहिले की, जरी आपण वसईचा तह केला असला तरी पण तो तह म्हणजे काही ब्रम्हवाक्य नव्हे. आपण - पेशवे - होळकर - भोसले - शिंदे मिळून



वसईचा तह नकारुन देऊ इंग्रजांना पराभूत करु[४]. आपआपसातील भांडणे किंवा वादविवाद यांचा निवाडानंतर करुच म्हणूनच ब-हाणपूरहून अजिंठ्याकडे शिंदे, नागपूरहून अजिंठयाकडे भोसले, चांदवडहून होळकर यांची भेट फर्दापूर येथे १९ जून १८०३ ला निश्चित करण्यात आली होती मात्र यशवंतराव होळकर ब्रिटिशांच्या नीतिमुळे फुटला आणि.चांदवडहून निघालेले होळकर परत चांदवडला पोहचलेला. भोसले आणि शिंदे यांचा सैन्यतळ अजिंठा - भोकरदन भागात पोहचला.

आसईच्या रणभूमीवर दौलतरावाचा सेनापती यादवपंत भास्कर होते तर गोपाळराव भाऊ खटके, माधवराव फाळके, लक्ष्मणराव फाळके, बेगम समरु इ. उपस्थितीत होते. भोसलेंचे नेतृत्व बेर्मींग, हाजारी, विठ्ठलपंत परांजपे यांच्याकडे होते[५]. दि. ०५-१० सप्टें १८०३ ला जाफ्राबाद जालना मराठयांनी जिंकले. सततच्या हल्लामुळे अन्नधान्य व रसदचा तुटवडा इंग्रज सैन्यात होता. मराठा सैन्याने जालना किल्ला जिंकला. अहमदनगरच्या निजामाची बाजारपेठ ताब्यात घेतली. जालना जिंकून पूढील भाग जिंकून पूढे जाण्याचा मराठयांचा मनोदय लक्षात येताच वेलस्ली औरंगाबादहून जालन्याकडे निघाला. बदनापूरला वेलस्ली - स्टीव्हनसन एकत्र येताच मराठा सैन्य पुढे न जाता भोकरदनला परत आले. १८ सप्टें १८०३ ला मराठा सैन्याची छावणी आसईला एकत्र आली. तोफखाना - अश्वदळ - पायदळ यांचे एकत्र संचलन घेतले[६].

दक्षिण भारतात आठराव्या शतकाच्या उत्तरार्धात मराठे-निजाम आणि हैदरअली या तीन प्रमुख सत्ता होत्या. या तिन्ही संस्थानिकांनी एकत्र येवून आपल्याला अडचणी करु नये म्हणून ब्रिटिशांनी (फोडा आणि झोडा) नीतिचा वापर केला. पहिल्या मराठा - इंग्रज युध्दात इ.स. १७७५ - ८२ यात मराठयांना विजय मिळाला. इ.स. १७९८ ला लॉड ऑर्थर वेलस्ली ग.ज. बनला. त्याने अनेक संस्थानिकांशी तैनाती फौजबाबत करार केले. ३१ डिसें १८०२ ला वसईचा तह मराठयांशी ब्रिटिशांनी केला.

होळकर - शिंदे यांच्यात परस्पर संघर्ष पानिपतपूर्वी १७६१ पासून होता. सत्तेच्या भूमिकेतून शिदेंनी उत्तरेत जाण्यास नकार दिला. होळकर तटस्थ राहिले. ग.ज. ऑर्थर वेलस्ली आणि कर्नल स्टिव्हनसनयांनी युध्दाचे नियोजन केले. २१ सप्टें. १८०३ ला लॉर्ड वेलस्लीच्या नेतृत्वाखाली भोकरदन तालुक्यातील कोलते टाकली येथूनच जवळ असलेला टेकडी वरुन मराठा फौजेची टेहाळणी केली. खेळणानदीच्या खो-यात मराठा सैन्याचा तळ होता. मराठा सैन्याच्या तळावर अचानक हल्ला नदीच्या उतार भागातून लॉर्ड वेलस्लीने

केला. प्रतिकूल परिस्थितीत स्टीव्हनसनची मदत पूर्व भागातून पोहचली नाही तरी वेलस्लीने विजय मिळविला[७].

**आसई युध्द :** मराठ्यांना पानिपतपूर्वी पराभव माहित नव्हता. मराठ्यांचे वर्चस्व सर्वस्व होते. उदगीर, राक्षसभूवन, सिंदखेडराजा, साखरखर्डा येथे मराठ्यांना विजय मिळाला. निजामाने ब्रिटीशांशी करार मराठ्यांचा उपद्रव होवू नये, पराभव करता यावा याच उद्देशाने केला.. बाजीराव दुस-याने ब्रिटीशांशी करार केला. कर्नल क्लोजशी करार करुन ब्रिटीशांना ६०००० फौज बदल्यात २६ लाखाचा प्रदेश मिळाला. बाजीराव दुस-याने ब्रिटीशांशी करार करताच मराठा सरदार शिंदे + भोसले + होळकर नाराज झाले[८], एकत्र आले. या फौजेच्या संघर्ष ब्रिटीश सेनापती कर्नल स्टीव्हनसन आणि लॉर्ड वेलस्ली यांच्याशी झाला. जालना जिल्हयातील जाफ्राबाद तालुक्यातील खेळणानदी काठच्या आसई (ता. भोकरदन) गांवात झाला. यात अकरा ऑफिसर्स आणि ११३ उच्चदर्जाचे सैनिक मारले गेले यांच्या प्रित्यर्थ इ.स. १९२४ ला आसईच्या रणभूमीवर एक स्मरण लेख लावण्यात आला आहे. या लेखात,

७४th High landers in th memory of ११ officers and ११३ other Rank of the ७४th high landers who fell in Action before the villege of Assaye on २३rd September १८०३

This tabled is placed in १९२४ by their successors in the Battalion[९].

आसईच्या युध्दात मराठयांचा पराभव - ब्रिटिशांचा विजय झाला याचे कारणे - ब्रिटिश सैन्याचे वेलस्ली आणि स्टिव्हनसनचे नेतृत्व, मराठयांची फितुरी, होळकर सरदार तटस्थ राहिले, ब्रिटिश सैन्य शिस्तीचे होते, मराठयांच्या सैन्याचा गाफीलपणा, आद्ययावत शस्त्राचा मराठयांकडे अभाव होता, इंग्रजांकडे बंदुका होत्या, इ[१०].

२१ सप्टे. १८०३ ला लॉर्ड वेलस्ली आणि कर्नल स्टीव्हनसन बदनापूर ता. बदनापूर जि. ठाणे येथे एकत्र भेटले. दोघे अनुक्रमे पूर्व-पश्चिम बाजूने शिंदे व नागपूरकर भोसल्यांच्या फौजेला घेरण्यासाठी निघाले. मराठा सरदार आणि ब्रिटिश यांच्यात संघर्ष झाला. मराठे - ब्रिटिश यांच्या फौजेला एक महिण्याचा कालावधी लढण्यासाठी मिळाला. २४ ऑगस्ट ते २३ सप्टेंबर हा युध्दाच्या तयारीचा कालखंड होता. २१ ऑगस्ट १८०३ ला दुस-या मराठा-इंग्रज युध्दाची घोषणा झाली.

**मराठा सरदार शिंदे आणि ब्रिटीश संघर्ष : इ.स. १८०३**

मराठ्यांच्या इतिहासात शिंदे घराण्याला अनण्य असे महत्व आहे. जयाप्पा शिंदे - १७५५ (नागोर), दत्ताजी शिंदे (पानिपतपूर्व), जनकोजी शिंदे-तुकोजी शिंदे पानिपत (१७६१)



आणि महादजी शिंदे आणि त्यांचा उत्तराधिकारी दौलतराव शिंदे (वय-१५) कारभारी बणला[११]. द बॉय व महादजी शिंदेंनी वर्चस्व उत्तर भारतात प्रस्थापित केले. द बॉय हा मूळतः फेंच आणि फ्रेंच मिलिटरी अॅकेडमीतील होता. ऑर्थर वेलस्लीची नियुक्ती भारतात इ.स. १७९७-९८ मध्ये झाली. टिपू सुलतान, धोंडूवाघ, इ. चा पाडाव ऑर्थर वेलस्लीने केला. म्हणून त्याच्यावर लंडनला परत बोलावून नेपोलियन बोनापार्टच्या पराभवासाठी मोहिम देण्यात आली. फ्रेंच अॅकेडमीत शिकलेला आणि घडलेला ऑर्थरवर फ्रेंचाच्या नेपोलियन विरुध्दची मोहिम देण्यात आली.

**परस्पर युती :**

मराठा सत्तेतील यशवंतराव होळकर आणि दौलतराव शिंदे यांच्यात आपआपसात संघर्ष होता. होळकर-शिंदे यांच्यात संघर्ष पानिपतपूर्व पासून होता. पेशवा बाजीराव दुसरा या दोन मराठा सरदारांत समन्वय - समझोता घडवू शकला नाही. दौलतराव उत्तरेत जाताच यशवंतराव होळकर पुण्यात दाखल झाले[१२]. बाजीराव दुस-याने तत्काळ ब्रिटिशांची होळकरांच्या भितीमुळेच समझोता केला (३१ डिसें १८०२) दौलतराव शिंदे यांनी त्यामुळे नागपूरकर भोसल्यांशी करार केला. दोघे एकत्र आले. वेलस्लीने अहमदनगरच्या लष्करी छावणीचा वापर केला. अहमदनगर -औरंगाबाद-जालना पश्चिम भागातून वेलस्लीने फौज एकत्र आणली. जालना छावणीतून कर्नल स्टीव्हनसनला एकत्र आणले-बोलावले. बाजीरावाच्या दुसरा मदतीला ब्रिटीश कंम्नीचा ऑर्थर वेलस्ली व कर्नल स्टीव्हनसनच्या तुकडीतील सैन्य होते[१३].

**आसई युध्द रणभूमी :**

कर्नल स्टीव्हन्सनकडे जालन्यात तोफखाना, ३ व ६ क्रमांकाचे नेटीव्ह अखदल ( ३rd - ६th Native cavalary ) चे ९०९ घोडेस्वार, पायदळ, १ स्कॉच ब्रिग्रेड - सहा नेटिव्ह बटानियन्स (६८११ सैन्य) व निजामाचे १६००० सैनिक होते. २१ सप्टे१८०३ ला स्टिव्हनसन आणि लॉर्ड वेलस्ली बदनापूर येथे एकत्र भेटले. बदनापूरच्यापूर्व बाजूने स्टीव्हनसन आणि पश्चिम बाजूने लॉर्ड वेलस्लीने एकत्र आलेल्या नागपूरकर भोसले आणि शिंदेंयांच्या सैन्याला वेढण्यासाठी निघाले. आसई, ता. भोकरदन येथे खेळणा समोर आणि पाठीमागे जेवा या नद्यांच्या भागात थांबलेल्या मराठा सैन्याला सुरक्षीत जागी पाहिले. लॉर्ड वेलस्लीने नद्यांना पाणी परपूर असल्याने समोरा - समोर युध्द नकरता खेळणा नदीला पिंपळगांव येथे उतार - पसरट पात्र असणा-या भागातून ओलांडले[१४] आणि मराठ्यांच्या सैन्यावर पाठीमागुन हल्ला चढविला. सकाळापासून युध्दासाठी सज्ज असतानाही युध्द करता आले नाही. नदी ओलांडण्यासाठी - पिंपळगांवपर्यंत पोहचून परत आसई (आसई-पिंपळगांव-आसई) यासाठी



Scanned by CamScanner

वेळ लागला. अगोदरच २१ सप्टेंबर १८०३ पासून बदनापूर ते आसई वेलस्ली थकला - भागला असला तरी आपण मराठा सैन्याच्या समोर उभे आहोत हे विसरला नाही. शिंदेच्या सैन्याची संख्या - घोडदळ आणि द. बॉय द्वारा प्रशिक्षीत सैन्य - तोफ यांचा विचार केला तर सांयकाळ झाल्यास मराठा सैन्य आपल्यास संकट उभा करेल म्हणून युध्द करण्याचा निर्णय घेवून लॉर्ड वेलस्लीने खेळणा नदी पिंपळगांवच्या भागातून ओलांडली आणि मराठा सैन्याशी दु. ३.०० ते ६.०० या काळात युध्द केले [१५]. अचानक झालेल्या ब्रिटिश हल्लाचा प्रतिकार शिंदेंनी मोठ्या प्रमाणात दिला. मात्र सांयकाळच्या अंधाराच्यामुळे मराठ्यांनी रणांगण सोडले आणि ब्रिटिशांना विजय मिळाला. या युध्दावेळी ले. कँबेल उपस्थित होता.

**नुकसान :**

आसईकडे निघालेला (बदनापूरच्या पश्चिम भागातून) जालना छावणीचा कर्नल स्टीव्हनसन वाट चुकल्यामुळे - खरे तर वाटाडयाच्या चुकीमुळे - युध्द २३ सप्टें१८०३ ला सांय. ६:०० वा संपल्यानंतर दुस-यादिवशी २४ सप्टें१८०३ ला पोहचला. स्टीव्हनसनने लॉर्ड वेलस्लीच्या ७४th High land Regiment ची झालेली हानी पाहिली, मृत सैनिक, जखमी सैनिक आणि वाचलेल्या सैनिकांना सुरक्षीत स्थळी पोहचविण्याची जबाबदारी लॉर्ड वेलस्लीने कर्नल स्टीव्हनसनवर सोपविली[१६]. तोफखाना प्रमुख मॅक्सवेल (Maxwell) मारला गेला. मराठ्यांचे १२०० सैनिक मारले गेले. आर्थर वेलस्लीच्या १९८ गोरे आणि २९८ हिंदी सैनिक असे ४९६ सैनिक मारले गेले. या गो-या सैनिकात अकरा अधिकारी आणि ११३ वरिष्ठ सैनिक यांचा समावेश होता. ७४th Highland Regiment, Madras ची विपुल हानी झाली. जालना छावणीच्या साहयाने युध्द करु इच्छिणारा लॉर्ड वेलस्लीची निर्णय क्षमता, साहस आणि सचोटी अत्यंत महत्वपूर्ण होती. उशीरा पोहचलेला कर्नल स्टीव्हनसनने जाफ्राबाद - अजिंठा येथील किल्लाकडे जखमींना रवाना केले. आश्रयीत ठेवले. २३ सप्टेंबर ते १६ ऑक्टोबर१८०३ या २०-२२ दिवसात आसईत पराभूत शिंदेच्या सैन्याचा पाठलाग आसईच्या उत्तरभागात करुन अजिंठा - खानदेश जिंकून तो ब-हाणपूरला पोहचला. ब-हाणपूर आणि गाविलगड त्याने जिंकले [१७].

आसईच्या युध्दात ४२८ ब्रिटिश सैन्य मारले गेले. ११३८ जखमी झाले यात एक उच्च, अधिकारी, सहा कॅप्टन, सात सैनिक, नऊ सर्जन, १४१ रँकर्स, २७ घोडेस्वार मारले गेले. तीन क्षेत्रीय अधिकारी, ६ कॅप्टन, २० सैनिक, ३३ सर्जनट, सहा ड्रमर्स, ३४३ रँकर्स जखमी आणि तीन घोडे जखमी झाले शिवाय मृतामध्ये स्थानिक कंपनीतील पाच सुभेदार, सोळा जमादार, ३९ हवालदार, ११३८ रँकर्स, ७५ घोडे यांचा समावेश



होता. १८ जण बेपत्ता होते [१८]. ग.ज.रिचर्ड वेलस्ली (लॉर्ड मॉर्निंग्टन) आणि त्याचा भाऊ ऑर्थर वेलस्ली (डयुक ऑफ वेलिगटन) या दोघांना भारताता आल्यानंतर पाच-सात वर्षाच्या काळात मराठ्यांना जिकण्यांचे काम उरकून दोघेही मायदेशी इंग्लंडला परत गेले. बहुतांश स्थानिकांना तैनाती फौज लागु करुन स्वराष्ट्राची सेवा त्यांनी केली. यासच पूढे ***सब्सिडिअरी सिस्टीम*** असे म्हणतात [१९]. ग.ज. वेलस्ली १८४२ आणि ऑर्थर १८५२ ला मृत्यू पावला.

शिंदेंचा सरदार अमीरखान व बेगम समरुची दोन फलटने यांना फीतुरीने आपल्या पक्षाकडे घेतले. शीख, भिल्ल यांना फितुर केले डयुक ऑफ वेलिग्टनने मराठ्यांच्या प्रतिकुल भौगोलिक परिस्थितीचा आणि काळाचा विचार करुन आसईच्या भूमीवर पराभूत केले [२०]. पटवर्धन, निपानकर, बापु गोखले, पेशवे, म्हैसुरकर, निजाम यांचे साहय ऑर्थर वेलस्लीला मिळाले [२१]

सारांशपणे विचार केला तर मेजर शर्मा आपल्या ***इंडीयन आर्मी थ्रु दि एजीस*** याग्रंथात म्हणतात, ह्री लढाई नेतृत्व आणि शिस्त आणि परिक्षा होती आणि यात दोन गुणात श्रेष्ठ असलेल्या पक्षाचा विजय झाला[२२].

आसाईच्या युध्दात जखमींना जाफ्राबाद-भोकरदनच्या भागात आश्रय देण्यात नकार स्थानिकांनी केला. कर्नल स्टीव्हनसनने त्यांचाही बंदोबस्त केला. २१ सप्टे १८०३ ला बदनापूर, २४ सप्टे १८०३ ला आसई, १६ ऑक्टो १८०३ ला ब-हाणपूर पोहचलेला आणि तदनंतर जालण्यात येवून शिंदेच्या ताब्यात असणारा जालना किल्ला घेणा-या कर्नल स्टिव्हनसनच्या सैन्याच्या तुकडीतील एकही सैनिक मारला गेला नाही. आसई युध्दात २४ तासाने उशिरा पोहचल्यामुळे त्याचे - त्याच्या तुकडीचे नुकसान झाले नाही मात्र लॉर्ड वेलस्लीच्या सैन्याचे नुकसान झाले. जालन्यात मराठ्यांच्या लष्कराचे केंद्र किल्ल्यात होते किल्ल्यात स्टिव्हनसनने ताब्यात घेतला. पाणी, हवामान व मैदानी प्रदेशाची मुबलकता जालन्यात असल्याने जालन्यात छावणी विकसीत झाली. जालन्याच्या पूर्वभागात कॅन्टची स्थापना १८२७ इ.स. झाली. दि. १४ जून १८०३ ला मराठा सरदार शिंदे - भोसले फर्दापूरला एकत्र भेटले ते ब्रिटिशांशी लढण्यासाठी तर दि. २१ सप्टे १८०३ ला कर्नल स्टीव्हनसन आणि ऑर्थर वेलस्ली भेटले ते बदनापूर येथे मराठ्यांच्या विरुध्द लढण्यासाठी परस्पर विरोधी चाललेला हा संघर्ष १४ जून १८०३ ते ३० नोंव्हे १८०३ पर्यंत चालला. यात वसई - आसई - लासवाडी - आडगांव असे संघर्ष घडले [२३].



Scanned by CamScanner

**संदर्भ :**

१. दैनिक सकाळ दि. २ जून २००१, पृ. ०१.
२. काथडेकर, कॅ. विनायक रामदास, अनु. प्रभाकर गद्रे, श्री. मंगेश प्रकाशन नागपूर, पृ, ६४-६५.
३. www.wikipedia.Arthur Wellesley.
४. कित्ता, पृ. ६३.
५. रोडे, प्रा.डॉ. सोमनाथ (संपा.), निवडक शोध निबंध, म.ई.प, अंक चौथा, डिसे. १९९९, पृ. ४५.
६. कित्ता.
७. कित्ता.
८. काळे, प्रा. भगवान, आपला जालना जिल्हा, संकेत प्रकाशन जालना, प्रथम आवृत्ती १९९१ पृ. ३-४.
९. कित्ता.
१०. दैनिक सकाळ दि. २ जून २००१, पृ. ०१.
११. जोगळेकर, स.आ., भारतातील युध्द शास्त्राची उपेक्षा, पृ. १०६.
१२. कित्ता.
१३. कित्ता.
१४. कित्ता.
१५. कित्ता.
१६. कर्नल पित्रे, मराठ्यांचा युध्द इतिहास, पृ. २१९ - २२१.
१७. कित्ता.
१८. Gazetteer of the Nizams Dominions, Aurangabad Dist. Bombay,TOI, १८८४, Reprint २००६, pp. ८४५-४७.
१९. सरदेसाई, जी. एस., ब्रिटिश रियासत- ०२, संपा. स. मा. गर्गे, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई - ३४, दुसरी आवृत्ती १९९३, पृ, १७१.
२०. मराठी विश्वकोश खंड १ , म.रा.सा.सं.मं मुंबई, पृ. ६५२ .
२१. कित्ता.
२२. जोगळेकर, स,आ.,पूर्वोक्त,पृ. १०२.
२३. काथडेकर, कॅ. विनायक रामदास, पूर्वोक्त, पृ. ७०.

◆◆◆



Scanned by CamScanner